आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१८ मे २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी नेमलेल्या सर्वपक्षीय प्रतिनिधी मंडळांचे दौरे जाहीर

- बांगलादेशातून आयात होणाऱ्या मालावर नवे निर्बंध

- नवनियुक्त पोप लिओ चौदावे यांचा शपथविधी आज व्हॅटिकन सिटीच्या सेंट पीटर्स चौकात होणार

**आणि**

- हैद्राबादच्या चारमिनार परिसरातल्या गुलजार हाऊसला लागलेल्या आगीत किमान ८ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं लवकरच वेगवेगळ्या देशांना भेट देणार आहेत. या संदर्भात, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या शिष्टमंडळांचं नेतृत्व करणाऱ्या खासदारांची आणि सदस्यांची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार, भाजपा खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालचा गट सौदी अरेबिया, बहरीन, कुवेत आणि अल्जेरियाला भेट देईल.

भाजपा खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालचा गट यूके, फ्रान्स, जर्मनी, युरोपियन युनियन, इटली आणि डेन्मार्कला भेट देईल.

जदयूचे खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालचा गट इंडोनेशिया, मलेशिया, दक्षिण कोरिया, जपान आणि सिंगापूरला भेट देईल.

शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचा गट युएई, लायबेरिया, काँगो आणि सिएरा लिओनला भेट देईल.

काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालचा गट अमेरिका, पनामा, गयाना, ब्राझील आणि कोलंबियाला भेट देईल.

द्रमुक खासदार कनिमोळी  करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालचा सहावा गट स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटविया आणि रशियाला भेट देईल.

आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालचा गट इजिप्त, कतार, इथिओपिया आणि दक्षिण आफ्रिकेला भेट देईल.

<><><><>

बांगलादेशातून आयात होणाऱ्या काही वस्तूंसाठी परदेश व्यापार महासंचालनालयानं  नवीन निर्बंध घातले आहेत. बांगलादेशातून सर्व प्रकारच्या तयार कपड्यांच्या आयातीला भूपृष्ठ-मार्गे बंदी असेल, पण न्हावा शेवा आणि कोलकाता या सागरी बंदरांमधून या वस्तूंच्या आयातीला परवानगी असेल. त्याशिवाय, फळं, फळांच्या स्वादाची आणि कार्बोनेटेड पेयं, प्रक्रियाकृत अन्नपदार्थ, कापूस आणि कापसाच्या धाग्याचा कचरा, रंगद्रव्य, प्लास्टिसायझर्स आणि देशांतर्गत उद्योगांसाठी वापरले जाणारे ग्रॅन्युल वगळता, प्लास्टिक आणि पीव्हीसीच्या तयार वस्तू आणि लाकडी फर्निचरच्या आयातीवर बंदी असेल. मासे, एलपीजी, खाद्यतेल आणि क्रश्ड स्टोन च्या आयातीवर मात्र हे निर्बंध लागू नाहीत. आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोरम, आणि पश्चिम बंगालमधलं चांगराबंधा आणि फुलबारी इथल्या लँड कस्टम स्टेशन अथवा  इंटिग्रेटेड चेक पोस्ट  द्वारे या वस्तूंची ने-आण करायला बंदी असेल. बांगलादेशातून भारतमार्गे नेपाळ आणि भूतान इथं जाणाऱ्या वस्तूंवर हे निर्बंध लागू होणार नाहीत. असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं अधिसूचनेत स्पष्ट केलं आहे . हे निर्देश तात्काळ लागू झाले आहेत.

<><><><>

एक देश, एक निवडणूक धोरणांतर्गत लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्यामुळे देशाची लोकशाही बळकट होईल, असा विश्वास

यासंदर्भातल्या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी यांनी काल व्यक्त केलं. रामनाथ कोविंद समितीच्या अहवालानुसार एक देश, एक निवडणूक राबवल्यास देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या १ पूर्णांक ६ दशांश टक्के, म्हणजे सुमारे साडेचार लाख कोटी रुपयांची बचत होईल, असंही त्यांनी मुंबईत वार्ताहरांना सांगितलं.

<><><><><>

भारतीय अंतराळ संशोधन संस्था - इसरोने आज ईओएस - झिरो नाईन या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचं प्रक्षेपण केलं, मात्र ही मोहिम अयशस्वी झाल्याचं, इसरोचे अध्यक्ष व्ही नारायणन यांनी सांगितलं. इसरोची ही एकशे एकावी मोहिम होती.

<><><><><>

नवनियुक्त पोप लिओ चौदावे यांचा शपथविधी आज व्हॅटिकन सिटीच्या सेंट पीटर्स चौकात होणार आहे. जगभरातून मान्यवर या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स, त्यांच्या पत्नी उषा व्हान्स, परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो तसंच कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांचा त्यात समावेश आहे. रोमन कॅथलिक चर्चचे पोप फ्रान्सिस यांचं गेल्या ८ मे रोजी निधन झाल्यानंतर रॉबर्ट फ्रान्सिस प्रेवोस्ट यांची निवड नवे पोप म्हणून झाली. शपथविधी झाल्यावर नव्या पोपना पारंपरिक पोशाख आणि अंगठी नजर करण्यात येईल नंतर ते पदभार स्वीकारतील.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. महाराष्ट्रात नागपूर जिल्ह्यात सावनेर इथं निघालेल्या तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते.

**होल्ड बाईट**

आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया अंतर्गत निर्मित शस्त्रास्त्रांमुळं पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात आपण विजयश्री प्राप्त केली. या शस्त्रास्त्रांसाठी जगातून भारताकडे मागणी होत आहे, असं फडणवीस यांनी वार्ताहरांशी संवाद साधताना सांगितलं. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर सर्व भारतीय तीनही दलाच्या सैनिकांसोबत आहेत हा संदेश देण्यासाठी नवी मुंबईतील वाशी इथं काल तिरंगा यात्रा काढण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथं आज तिरंगा यात्रा काढण्यात येणार आहे.जालना शहरातून निघालेल्या तिरंगा यात्रेत माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे,यांच्यासाह माजी सैनिक आणि जालना शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्यने सहभाग घेतला.

<><><><><>

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान आज नागपूरच्या दौऱ्यावर येत आहेत. यावेळी ते ‘विकसित कृषी’ या विषयावरच्या उच्चस्तरीय बैठकीचं अध्यक्षपद भूषवतील आणि नागपूर जिल्ह्याच्या प्रमुख कृषी विषयक आणि ग्राम विकास योजनांचा आढावा घेतील. आपल्या दौऱ्यात ते राष्ट्रीय मृदा वर्णक्रमीय ग्रंथालयाचं उदघाटन करतील. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रासाठी नवोन्मेषी योगदान देणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव केला जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

हैद्राबादच्या चारमिनार परिसरातल्या गुलजार हाऊसला आज सकाळी लागलेल्या आगीत किमान ८ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. मदतकार्य चालू असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे . तीन लहान मुलांसह १६ जणांना सुखरुप बाहेर काढलं आहे.  आगीचं कारण अद्याप समजू शकलं नाही. अग्निशमन

दलाच्या ११ बंबांच्या मदतीने आग आटोक्यात आणली. जखमींना विविध रुग्णालायात दाखल केलं आहे. शहराच्या गजबजलेल्या भागत झालेल्या या दुर्घटनेमुळे धुराचे लोट मोठ्या प्रमाणात उठल्यानं नागरिकांमधे घबराट पसरली होती. केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी तसंच तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी घटनास्थळी भेट देऊन मदतकार्याची पाहणी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून जखमी झालेल्यांना लोकर बरं वाटावं अशी कामना केली आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमी झालेल्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये अर्थसहाय्य जाहीर झालं आहे.

<><><><><>

रशिया आणि युक्रेन दरम्यान युद्धबंदी घडवून आणण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उद्या रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा करणार आहेत. दर आठवड्याला पाच हजाराहून जास्त रशियन आणि युक्रेनियन सैनिकांचे प्राण घेणारा "रक्तपात" थांबवण्यावर चर्चा केंद्रित असेल, तसंच व्यापाराशी संबंधित समस्यांवरही भर दिला जाईल, असं ट्रम्प यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. गेल्या शुक्रवारी, रशिया आणि युक्रेनच्या प्रतिनिधी मंडळानं तुर्कीच्या इस्तंबूल मध्ये भेट घेतली होती, आणि वाटाघाटीची एक नवीन फेरी आयोजित करायला सहमती दर्शविली होती. परस्परांचे एक हजार युद्धकैदी मुक्त करण्यावरही यावेळी सहमती झाली होती.

<><><><><>

आज आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिवस आहे. त्या निमित्ताने पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारीतली देशातली सर्व स्मारकं आणि संग्रहालयांमध्ये आज

मोफत प्रवेश मिळेल, असं केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयानं जाहीर केलं आहे. देशाचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यामध्ये, तसंच शिक्षण आणि संवादाला प्रोत्साहन देण्यात संग्रहालयांची महत्वाची भूमिका अधोरेखित करणं, हे आजच्या दिवसाचं उद्दिष्ट आहे.

//<><><><><>//